माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०५२/२०१७-१८
दि.०६/०४/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.०९/०३/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

माझे दि.२३/०२/२०१८ रोजी मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना दिलेले लिखित तक्रार.

१) वरील नमुद पत्रावर आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या तपशिलवार माहिती द्यावी.
२) वरील पत्र आपल्या कार्यालयात इनवर्ड झाला आहे व त्याच्यावर असलेली टिप्पणीचे सत्यप्रत द्यावी.
३) एका तक्रारी अर्जावर आपल्या विभागातर्फे किती दिवसात कार्यवाही नियमाने झाली पाहिजे या संदर्भात असलेली तपशिलवार माहिती द्यावी किंवा कोणतेही नियमावली अथवा नागरिकांची सनद असल्यास त्याची माहिती/ सत्यप्रत द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत जाणूनबुजून अपुर्ण माहिती दिल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२२/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०६/०४/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.आस्था/२५९/२०१८ दि.२६/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माहिती अधिकार अंतर्गत जाणूनबुजून जनमाहिती अधिकारी अपुर्ण माहिती देत आहेत. मी त्यांना माझ्या दि.२३/०२/२०१८ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती, परंतु जनमाहिती अधिकारी हे सुस्पष्ट पुर्ण माहिती देत नाहीत व आम्हास मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

३) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असुन पुनश्च: उपलब्ध अभिलेख्यानुसार सुधारित मुद्देनिहाय माहिती ०७ दिवसांत विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

O/C

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

3/8/18

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

9/4/2018

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.